RNI No. MAHBIL /2009/36619

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ११, अंक ५८] शुक्रवार, ऑक्टोबर १७, २०२५/आश्विन २५, शके १९४७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ११.००

असाधारण क्रमांक ७८

प्राधिकृत प्रकाशन

उपविभागीय अधिकारी, श्रीवर्धन उपविभाग श्रीवर्धन यांजकडून

अधिसूचना

भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.

क्रमांक संकिर्ण-क्र. उविअश्री/कात-६/भूसंपादन/मारळ/एसआरक्रं. १-२०२५/२०२५.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३(२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाव्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र.एसआयए-२०२५/प्र.क्र.१४०/भूसंपादन-२,दिनांक २६ सप्टेंबर, २०२५ (यात यापुढे जिचा निर्देश “उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील १०,००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता भूमीसंपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, **रायगड** जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या अनुसूची-एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश “उक्त जमीन" असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त “सार्वजनिक प्रयोजन" असा करण्यात आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे. असे वाटते, ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोनमध्ये दिलेले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची-तीन मध्ये दिलेली आहेत. (विस्थापन होणार असेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमुद करावीत);

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची चार मध्ये दिलेला आहे;

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची पाचमध्ये दिलेला आहे.(नियुक्ती करणे आवश्यक असेल तर, या अनुसूचीमध्ये तपशील नमूद करावा).

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनाकांपासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही:

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल:

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपुरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम(५) अनुसार, जिल्हाधिकारी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश "उक्त नियम" असा करण्यात आला आहे) यांच्या नियम १० च्या उप नियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमिअभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी **उपविभागीय अधिकारी श्रीवर्धन, उपविभाग श्रीवर्धन, नवीन प्रशासकीय भवन श्रीवर्धन, ता.श्रीवर्धन** यास पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूची-एक

जमिनीचे वर्णन

गाव मारळ, तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड

अनुक्रमांक	भूमापन किंवा गट क्रमांक	अंदाजित क्षेत्र (हेक्टरमध्ये)
१	४३९पै	०.२२०
२	५७५पै	०.१८४
३	५७७	०.५३०
४	५६८पै	०.२८३
५	५६६पै	०.१९१
६	५७६पै	०.२६०
७	४४८पै	०.३५४
८	५८४पै	०.०६०
	एकूण	**२.०८२**

अनुसूची- दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

अधिसूचना निर्गमित करण्यापूर्वी	प्रकल्पाचे नाव—	मौजे मारळ, ता. श्रीवर्धन येथील हरिहरेश्वर मारळ पाणीपुरवठा योजना प्रयोजनासाठी
	प्रकल्पकार्याचे वर्णन	मौजे मारळ, ता. श्रीवर्धन येथील हरिहरेश्वर मारळ पाणीपुरवठा योजना प्रयोजनासाठी संपादन करण्यात येणारी जमीन मारळ हद्दीत येते. सदरची जमीन ही हरिहरेश्वर मारळ पाणीपुरवठा योजना करीता संपादन करण्यात आलेल्या जमिनीलगत आहे.
	समाजाला मिळणारे लाभ	हरिहरेश्वर मारळ पाणीपुरवठा योजना मधून हरिहरेश्वर तिर्थक्षेत्र/पर्यटन स्थळ व परिसरातील गावाचा पिण्याचा पाण्याचा व्यवस्था/सोयी निर्माण होणार आहे.

अनुसूची- तीन

बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे	**निरंक**

अनुसूची- चार

सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश :-	हरिहरेश्वर मारळ पाणीपुरवठा योजना मधून हरिहरेश्वर तिर्थक्षेत्र/पर्यटन स्थळ व परिसरातील गावाचा पिण्याचा पाण्याचा व्यवस्था/सोयी निर्माण होणार आहे. सदरचा प्रस्ताव थेट खरेदी व्यवहाराद्वारे सन २०१९ मध्ये प्रस्तावित होता, परंतु उपरोक्त अधिसूचनेमधील गट नंबर हे वर्ग-२ वारस तपास व वारसामध्ये आपआपसात संमजोता न होणे यामुळे सदरचा प्रस्ताव भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अन्वये करण्यात येत आहे.

अनुसूची- पाच

नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील	**निरंक**

टिप.—उक्त जमिनीच्या आराखडयाचे **उपविभागीय अधिकारी, उपविभाग श्रीवर्धन** यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

श्रीवर्धन,

दिनांक १५ ऑक्टोबर २०२५.

महेश पाटील,
उपविभागीय अधिकारी,
श्रीवर्धन उपविभाग श्रीवर्धन.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.